**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेत वंदे मातरमवर चर्चा, समृद्ध भारताची भावना वंदे मातरम् मुळे फलद्रुप होईल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांकडून व्यक्त

- आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिभार विधेयकाला संसदेची मंजुरी

- पक्षाची अद्ययावत घटना महिनाभरात सादर करण्याच्या निवडणूक आयोगाच्या सर्व राजकीय पक्षांना सूचना

**आणि**

- गेल्या आठवडाभरात रद्द झालेल्या तिकिटांचे सव्वा आठशे कोटी रुपये प्रवाशांना परत दिल्याची इंडिगोची माहिती

**<><><><><>**

समृद्ध भारताची भावना वंदे मातरम् मुळे फलद्रुप होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. लोकसभेत आज वंदे मातरम या गीतावरच्या चर्चेला सुरूवात करताना ते बोलत होते. या चर्चेविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

-- - **होल्ड - कॅप्सूल** - - -

*(ज्या वंदे मातरम् मंत्राने स्वातंत्र लढ्यासाठी प्रेरणा दिली, तोच मंत्र समृद्धतेचीही प्रेरणा देईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. वंदे मातरम् ही फक्त स्मरण करण्याची बाब नव्हे तर संस्कृतीच्या अखंड प्रवाहाचं प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. आपल्यावर वंदे मातरम् चं ऋण असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं, ते म्हणाले –*

*- - होल्ड… बाईट - प्रधानमंत्री- -*

*यावेळी त्यांनी वंदे मातरमच्या दीडशे वर्षांच्या इतिहासाचा मागोवा घेतला. तसंच काँग्रेसच्या धोरणांवर टीका केली.*

*वंदे मातरम हा समर्पण आणि एकतेचा एक कालातीत मंत्र असून भारताच्या स्वावलंबन आणि प्रगतीच्या संकल्पाला तो प्रेरणा देतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग या चर्चेत म्हणाले.*

*- - - होल्ड - राजनाथ सिंग - -*

*बंगालच्या पवित्र भूमीने भारताला फक्त वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत नाही, तर देशाला त्याचं राष्ट्रगीतही दिलं, असं प्रतिपादन काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी या चर्चेदरम्यान केलं. तसंच प्रधानमंत्र्यांनी या चर्चेला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केल्याची टीकाही गोगोई यांनी केली. वंदे मातरम गीतावरच्या चर्चेद्वारे सरकार सध्याच्या आव्हानांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी केली आहे. वंदे मातरम हे गीत देशाचा आत्मा आहे आणि त्यावर कोणताही प्रतिवाद होऊ शकत नाही, असं गांधी म्हणाल्या.*

*- - होल्ड - प्रियंका गांधी - -*

*धर्माच्या आधारावर होणारं राजकारण फेटाळून लावणं हा वंदे मातरमचा उद्देश होता असं समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव म्हणाले. श्रीरंग बरणे, अरविंद सावंत, भास्कर भगरे यांच्यासह विविध खासदारांनी या चर्चेत सहभाग घेतला.)*

**<><><><>**

'आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिभार विधेयक, २०२५' या विधेयकाला आज संसदेची मंजुरी मिळाली. चर्चेनंतर राज्यसभेनं हे विधेयक लोकसभेत परत पाठवलं. गेल्याच आठवड्यात या विधेयकाला लोकसभेची मंजुरी मिळाली होती. हा उपकर अनुचित वस्तूंवरच लागू होणार असून याचं स्वरुप, उत्पादन शुल्क प्रकारचं नसेल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज राज्यसभेत विधेयक मांडताना स्पष्ट केलं. गुटखा आणि पान मसाल्यावर बंदी लादण्याची मागणी काँग्रेस खासदार शक्तीसिंह गोहिल यांनी या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान केली. शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी वाढत्या मद्यपानावर चिंता व्यक्त केली.

या विधेयकाच्या माध्यमातून केवळ आरोग्याला हानीकारक असलेल्या वस्तूंवर अधिभार लावला जाईल, जीवनावश्यक वस्तूंवर नाही, असं या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना सीतारामन म्हणाल्या. आरोग्य हा राज्य सूचीतला विषय असून या अधिभारातून जमा होणारा महसूल राज्यांनाही दिला जाईल, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**<><><><>**

अनधिकृत डिजिटल लोन ॲप्सच्या कर्ज व्यवहारांना आळा घालण्यासाठी सरकार सातत्यानं रिझर्व्ह बँकेच्या संपर्कात असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं यंदा १ जुलैपासून त्यांच्या वेबसाईटवर, लोकांच्या माहितीसाठी, डिजिटल कर्ज देणाऱ्या ॲप्सची डिरेक्टरी उपलब्ध केली आहे. रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत बँका आणि इतर वित्तीय संस्थांच्या डिजिटल कर्ज ॲप्सचा त्यात समावेश आहे. अनधिकृत डिजिटल कर्ज ॲप्स ब्लॉक करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला दिले आहेत, असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या साडे पाच वर्षात, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी ६ लाख १५ हजार कोटी रुपयांची कर्जं निर्लेखित केली आहेत. केंद्रिय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. यंदा ३० सप्टेंबरपर्यंत निर्लेखित कर्जाची रक्कम ६ लाख १५ हजार ६४७ कोटी रुपये झाल्याचं त्यांनी सांगितलं. या निर्लेखित कर्जांच्या वसुलीची प्रक्रिया सुरु आहे, असं ते म्हणाले.

आर्थिक वर्ष २०२२-२३पासून सरकारनं सार्वजनिक बँकांमधे भांडवल ओतलेलं नाही. या बँकांनी त्यांच्या वित्तीय कामगिरीत लक्षणीय सुधारणा केली असून त्या नफाक्षम झाल्या आहेत, त्यांची भांडवल स्थिती मजबूत झाली आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राजकीय पक्षांनी त्यांच्या पक्षाच्या घटनेची अद्ययावत प्रत ३० दिवसांच्या आत सादर करावी, अशी सूचना निवडणूक आयोगानं आज केली. पक्षांची उद्दिष्टं आणि लोकशाही पद्धतीनं चालण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रियांची माहिती देणारा हा दस्तावेज महत्त्वाचा असून तो जमा करणं सर्व राजकीय पक्षांना बंधनकारक आहे, असं आयोगानं पक्षप्रमुखांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. या घटना आयोगाच्या वेबसाईटवर अपलोड केल्या जातात.

**<><><><><>**

१ ते ७ डिसेंबर या कालावधीत विमानांची सुमारे ६ लाख तिकिटं रद्द झाली आहेत. या प्रवाशांचे ८२७ कोटी रुपये परत केल्याची माहिती इंडिगो या हवाई वाहतूक कंपनीनं दिली आहे. सोमवारी कंपनीनं सुमारे १८०० उड्डाणं केली आणि त्यातली ९१ टक्के वेळेवर होती, असं कंपनीनं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. ९ हजार बॅगांपैकी साडे चार

हजार बॅगा प्रवाशांच्या नियोजित पत्त्यावर पोहोचवण्यात आल्या असून उर्वरीत बॅगा पुढच्या ३६ तासांत परत केल्या जातील असं त्यात म्हटलं आहे.

विमान वाहतूक ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असून याच्या सुरक्षेबद्दल कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असं विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते राज्यसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना बोलत होते. उड्डाणं रद्द का झाली याची चौकशी सरकार करत आहे, सरकारने हे प्रकरण गांभीर्याने घेतलं असून यात दोषी असणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असं नायडू म्हणाले. देशाला किमान ५ मोठ्या विमान कंपन्यांची गरज आहे. त्यासाठी मंत्रालय प्रयत्नशील असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

नफावसुली आणि परदेशी गुंतवणूकदारांनी केलेल्या विक्रीमुळं देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार घसरण झाली. अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या पतधोरण आढाव्याच्या पार्श्वभूमीवरही गुंतवणूकदार साशंक आहेत. दिवसअखेर सेन्सेक्स ६१० अंकांची घट नोंदवून ८५ हजार १०३ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी २२६ अंकांनी घसरुन २५ हजार ९६१ अंकांवर थांबला. सत्रादरम्यान दोन्ही निर्देशांक आणखी जास्त घसरले होते पण नंतर त्यात थोडी सुधारणा झाली. बांधकाम उद्योग, बँका यासारख्या क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात आज मोठी घसरण झाली.

<><><><><>

नक्षली संघटनेच्या केंद्रीय कमिटीचा सदस्य रामाधर माज्जी याच्यासह बारा नक्षलवाद्यांनी छत्तीसगड पोलिसांसमोर आज आत्मसमर्पण केलं. रामाधर माज्जी याच्यावर एक कोटीचं इनाम होतं.

<><><><><>

गोवा इथल्या एका क्लबमधे लागलेल्या आगीमधे २५ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी आज चार जणांना अटक केली आहे. यात अरपोरा नाईट क्लबच्या जनरल मॅनेजरचा समावेश आहे. क्लबच्या मालकासह मॅनेजर आणि आयोजकावर गुन्हा दाखल झाल्यानंतर ही अटक करण्यात आली आहे. नाईटक्लबला २०१३ मधे व्यापार परवाना दिल्याप्रकरणी अरपोरा-नाओआ ग्रामपंचायतीच्या सरंपचालाही ताब्यात घेण्यात आलं आहे.

<><><><><>

भारतविरोधी कट्टर संघटनांविरुद्ध ब्रिटनच्या सरकारनं केलेल्या कारवाईचं केंद्र सरकारनं स्वागत केलं आहे. अशा कट्टरतावादी व्यक्ती आणि संघटना संपूर्ण जगासाठी घातक आहेत, असं प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत केलं. चीनमध्ये किंवा चीनमार्गे प्रवास करणाऱ्या भारतीयांना सतर्क राहायचं आवाहन त्यांनी केलं. चीनच्या विमातळांवरून प्रवास करणाऱ्या भारतीयांना लक्ष्य केलं जाणार नाही, किंवा ताब्यात घेतलं जाणार नाही, अशी हमी चीनकडून अपेक्षित आहे, अशी माहिती त्यांनी दिली. म्यानमारमध्ये लोकशाही प्रक्रियेतून येणाऱ्या सरकारचं त्यांनी स्वागत केलं.

//<><><><><>//